महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद-४३१००२.
Maharashtra State Board of Waqfs, Panchakki, Aurangabad. 431 002
مہاراشٹراسٹیٹ وقف بورڈ، پن چکی اورنگ آباد ٤٣١٠٠٢
Website: www.mahawakf.com, Email: ceomsbw@gmail.com Tele: 0240-2401584, 2991259

NO. MSBW/EST/53/2553/22

Date: 23 MAR 2022

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ
पनचक्की, औरंगाबाद-४३१००१

## जाहीर प्रगटन

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद या कार्यालयात **विधी सल्लागार (१ पद), विधी अधिकारी (२ पदे), लेखा अधिकारी (१ पद), महसुल अधिकारी (१ पद),** व **प्रशासन अधिकारी (१पद),** ही पदे कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यासाठी दिनांक ३०/०४/२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी शैक्षणिक अहर्ता व अनुभव याबाबतची माहिती कार्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**१) विधी सल्लागार (१ पद)**
शैक्षणिक अर्हता : विधी शाखेची पदवी.
अनुभव: जिल्हा न्यायालय/ उच्च न्यायालय येथे किमान १५ वर्ष Practicing Advocate असल्याचा अनुभव किंवा शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ शासकीय उपक्रम येथे दिवाणी न्यायालयाशी संबंधीत विधी सल्लागार म्हणून काम केल्याचा अनुभव. राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था येथे विधी सल्लागार म्हणून काम केलेल्या सेवानिवृत्त अधिका-यास प्राधान्य.

**२) विधी अधिकारी (२ पदे)**
शैक्षणिक अर्हता : विधी शाखेची पदवी.
अनुभव : जिल्हा न्यायालय/ उच्च न्यायालय येथे किमान १० वर्ष Practicing Advocate असल्याचा अनुभव किंवा शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ शासकीय उपक्रम येथे दिवाणी न्यायालयाशी संबंधीत विधी अधिकारी म्हणून काम केल्याचा अनुभव. राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था येथे विधी अधिकारी म्हणून काम केलेल्या सेवानिवृत्त अधिका-यास प्राधान्य.

**३) लेखा अधिकारी (१ पद)**
शैक्षणिक अर्हता : वाणिज्य शाखेची पदवी.
अनुभव : शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ शासकीय उपक्रम येथे लेखा विषयक काम करण्याचा अनुभव. सहकारी संस्था, वित्त संस्था येथे लेखा विषयक अनुभव असलेल्या सेवानिवृत्त शासकीय व्यक्तीस प्राधान्य.

**४) महसुल अधिकारी (१ पद)**
शैक्षणिक अर्हता : मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवी.
अनुभव : शासन सेवेतील महसूल विभागात तहसीलदार पेक्षा कमी नसलेल्या पदावर काम केल्याचा अनुभव. भुसंपादनाशी संबंधित कामकाज हाताळण्याचा अनुभव असलेल्या अधिका-यास प्राधान्य.

**५) प्रशासन अधिकारी (१ पद)**
शैक्षणिक अर्हता : मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवी.
अनुभव : शासन सेवेतील किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रशासकीय अधिकारी पदावर प्रशासकीय स्वरुपाचे कामकाज केल्याचा अनुभव. उर्दूचे ज्ञान असलेल्या सेवानिवृत्त अधिका-यास प्राधान्य.

23/03/2022

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,
औरंगाबाद.